बुद्धिमान लोग कोई काम करते समय और किसी से बात करते समय खुद पर नियंत्रण रखते हैं। जबकि मूर्ख व्यक्ति हर स्थिति में अनियंत्रित रहता है।

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार २८ जानेवारी २०२५ | अंक५० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# वाल्मिक कराड प्रकरणी डॉक्टरांची चौकशी करा

## पोलीस अधिकाऱ्याला सहआरोपी करा:

## मनोज जरांगे पाटील यांची सर्वात मोठी मागणी

### आरोपींना व्हीआयपी ट्रीटमेंट मिळत आहे

सगळया आरोपींना व्हीआयपी ट्रीटमेंट मिळत आहे. सगळ्यांकडे भरपूर माहिती आहे, या पोलीस अधिका-यांना सह आरोपी करा, सरकारी डॉक्टरची देखील चौकशी करा, प्रकाश आबिटकर यांना विनंती आहे, कराड याचं दुखत नसताना देखील त्याचे डॉक्टर त्याचं दुखत असल्याचं सांगत आहेत. त्यांची चौकशी करा, त्याच दुखत नसताना त्याला दवाखान्यात का ठेवलं आहे? वाल्मीकला गुन्ह्यातून सोडण्यासाठी डॉक्टर आणि पोलीसांनी हे षडयंत्र केलं आहे का? असा सवाल यावेळी जरांगे पाटील यांनी उपस्थित केला आहे



मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा उपोषणाला बसले आहेत, आज त्यांच्या उपोषणाचा दुसरा दिवस आहे. यावेळी बोलताना त्यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे, तसेच वाल्मिक कराडसंदर्भात प्रतिक्रिया देताना मोठी मागणी केली आहे. मराठ्यांनी लढून अन्यायकारक राजवट उलटून टाकली, मात्र आम्हाला अजून हक्क मिळत नाही, जुलमी राजवटीत एवढा अन्याय झाला नाही तेवढा अन्याय या राज्यात सुरू आहे, तुम्ही आम्हाला आरक्षण दिल नाही, तर तुमचा मराठा द्वेष उघड होणार, तुम्ही मराठा विरोधी लोक आहात हे जाहीर होणार, मुख्यमंत्र्यांच्या मनात मराठ्यांच्या विरोधात राग असेल तर ते आरक्षण देणार नाही असं मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी म्हटलं आहे.दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी वाल्मिक कराडवर प्रतिक्रिया देताना मोठी मागणी केली आहे. त्याला काहीही झालेलं नाही, सत्तेचा वापर करून अधिकारी पाठवले जात आहेत. षडयंत्र सुरू आहे, दवाखान्यात नेऊन सोडण्याचं ऑपरेशन सुरू आहे. आता सरकारने एक काम करावे. शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकाऱ्यांचे सीडीआर काढावेत, त्याच्या ड्रायव्हरचे सीडीआर काढा. तो दुसऱ्यांच्या फोनवरून बोलतो, गेवराई पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकाऱ्यांनी त्याला चादरी नेऊन दिल्या. त्यांचीही चौकशी करा.सगळया आरोपींना व्हीआयपी ट्रीटमेंट मिळत आहे. सगळ्यांकडे भरपूर माहिती आहे, या पोलीस अधिकाऱ्यांना सह आरोपी करा, सरकारी डॉक्टरची देखील चौकशी करा, प्रकाश आबिटकर यांना विनंती आहे, कराड याचं दुखत नसताना देखील त्याचे डॉक्टर त्याचं दुखत असल्याचं सांगत आहेत. त्यांची चौकशी करा, त्याच दुखत नसताना त्याला दवाखान्यात का ठेवलं आहे? वाल्मीकला गुन्ह्यातून सोडण्यासाठी डॉक्टर आणि पोलीसांनी हे षडयंत्र केलं आहे का? असा सवाल यावेळी जरांगे पाटील यांनी उपस्थित केला आहे.पुढे बोलताना ते म्हणाले की, मुख्यमंत्र्यांच्या मुंडक्यावर पाय देऊन आरोपी सुटले तर आम्ही तुम्हाला सोडणार नाही, सर्वांची नार्को टेस्ट करा आणि केस अंडर ट्रायल चालवा अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे.

## नारायण गडावरील अखंड हरिनाम सप्ताहाची ख्यातनाम संतांच्या रसाळ वाणीतून सांगता



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : लोहा तालुक्यातील पिंपळदरी नारायण गड येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताह काल्याची सेवा ह.भ.प. गायनाचार्य शंकर महाराज लोंढे सोनमांजरीकर यांच्या रसाळ व सुश्राव्य गोड वाणीतून संपन्न झाली. या सप्ताह निमित्ताने महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक ह.भ.प.योगेश महाराज मोरे आहेरवाडीकर, ह.भ.प. निवृत्ती महाराज किरडे चाटोरीकर, मृदंग वादक ह.भ. प.दत्ता महाराज सोलव, ह.भ.प.लक्ष्मण महाराज शिंदे, ह.भ.प.विणेकरी चांदबा पाटील करमाळेकर, चोपदार ह.भ.प.माधवमामा अंचोलीकर यांची उत्तम सेवा लाभली तसेच या सप्ताह सांगता कार्यक्रमाला महंत १००८ श्री श्री श्री गुरुवर्य प्रयागगिर महाराज मठ संस्थान डोलारा ह.भ.प. कृष्णा महाराज मारतळेकर यांची तसेच प्रणिताताई देवरे (चिखलीकर) भास्कर पाटील ढगे, भास्करराव जोमेगावकर, ऊध्दव ढेपे, बाबुराव पाटील वडवळे, शंकर मालीपाटील, संजय वडवळे, ऊत्तमराव वडवळे , संगनवार सावकार, परमेश्वर घागरदरे, अनिल बेटकर व परिसरातील सर्व भाविक भक्त मंडळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी महाप्रसादाचे सप्ताहाची सांगता झाली.

## ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त सरपंच नारायण साळुंके व उपसरपंच तौफिक पठाण यांच्यावतीने

### नागापूर खुर्द शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप





बीड : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नागापूर खुर्द येथे ७६ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणाचा व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका सुमन जोगदंड ह्या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून गावचे सरपंच सुमेधा नारायण साळुंके, उपसरपंच तौफिक पठाण , शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर साळुंके, सेवा सोसायटीचे चेअरमन विष्णू साळुंके, सैनिनाथ साळुंके,विक्रम बाप्पा साळुंके, दिलावर पठाण, अलीम पठाण, आरोग्य केंद्राचे महेश सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताच्या संविधाना चे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर साळुंके यांनी ध्वजारोहण केले. त्यानंतर शाळेतील इयत्ता पहिली ते सातवी मधील एकूण ५० विद्यार्थ्यांनी भाषणे सादर केली. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये ओ माय फ्रेंड गणेशा, चिऊताई चिऊताई, ऐ वतन मेरे आबाद रहे तू, जलवा जलवा असे एक ना अनेक गाण्याचे सादरीकरण शाळेतील विद्यार्थ्यांनी केले. त्याला समस्त गावक-यांनी भरभरून बक्षीस दिले. त्यानंतर प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळेत घेतलेल्या विविध क्रीडा स्पर्धा याचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.बक्षीसामध्ये रंगपेटी, पेन्सिल, खोडरबर , चित्रकला वही, एक रेघी वही , रजिस्टर, दोरी, पट्टी, लाल पेन ,काळे पेन, पॅड, निळा पेन, चार रेघी वही, गणितीय पुस्तके, सामान्य ज्ञान वर आधारित पुस्तके, पाण्याची बाटली, कंपास पेटी, आदी भेटवस्तू विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील प्राथमिक पदवीधर सुधीर कदम, ज्येष्ठ शिक्षिका अलका गेठे , प्रतिमा छत्रबंद , प्रज्ञा उजगरे, अजित मुळूक, सखाराम साळुंके आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजित मुळूक यांनी केले. तर अध्यक्षीय समारोप श्रीमती सुमन जोगदंड यांनी केला.

## विकसित जिल्हा अशी बीडची ओळख घडवू क्रीडामंत्री - दत्तात्रय भरणे

### ७६ व्या प्रजासत्ताक दिन शानदार सोहळयात संपन्न

बीड, दि. २६ :- बीड जिल्ह्यात अधिकाधिक सर्वांगीण विकास कामे करून विकसित बीड जिल्हा अशी ओळख प्राप्त करून देण्याचे नियोजन आहे. यासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, असे प्रतिपादन राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज येथे केले. पोलीस मुख्यालय मैदानावर ७६ व्या प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय सोहळा श्री भरणे यांच्या हस्ते पार पडला त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार संदीप क्षीरसागर वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत तसेच जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने आदींची प्रमुख उपस्थिती होती. या दिमागदार सोहळ्यात पोलिसदलासह होमगार्ड, एन.सी.सी. तसेच स्काऊट गाईड आदींच्या १९ पथकांनी संचलन केले. या परेडचे नेतृत्व बीडचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांनी केले. ध्वजारोहणा नंतर भरणे यांनी परेडची पाहणी केली. आपल्या भाषणात त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात बलिदान देणारे स्वातंत्र्य सैनिक आणि सीमेवर शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण केली. देशाला पाचवी अर्थसत्ता बनविल्याबद्दल प्रधानमंत्र्याचे त्यांनी आभार मानले. राज्यात ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेला नेण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी संकल्प केला आहे. त्याबद्दल त्यांचे व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे त्यांनी आभार व्यक्त केले. आद्यकवी मुकुंदराज यांच्या जिल्ह्यात ध्वजारोहण करण्याची संधी मिळाली हे माझे भाग्य समजतो असे श्री भरणे यावेळी म्हणाले. खोखो विश्वचषक जिंकून देणारे बीडची कन्या प्रियंका इंगळे तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे नाव उंचावणारे बीडचे अविनाश साबळे तसेच राहुल आवारे आणि नवनाथ फरताडे यांचे त्यांनी आपल्या भाषणात कौतुक केले. बीड जिल्हावासियांचे रेल्वेचे स्वप्न केंद्र आणि राज्य सरकारच्या प्रयत्नामुळे साकार होत आहे. यामुळे बाजारपेठ जवळ होऊन जिल्ह्यातील शेतकऱ्यासह सर्वांनाच फायदा होणार आहे असे सांगणे श्री भरणे यांनी सेंद्रिय शेती तसेच रेशीम शेतीत जिल्हाला प्रथम क्रमांकावर आणल्याबद्दल शेतकऱ्यांचे अभिनंदन केले.



जिल्हयात क्रीडा सुविधासाठी ८ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले असून माजलगाव, वडवणी, गेवराई, केज, अंबाजोगाई आणि धारूर या ६ ठिकाणी तालुका क्रीडा संकुल उभारण्यात येईल, असेही क्रीडामंत्री यावेळी म्हणाले. जिल्ह्यात होणाऱ्या रस्त्यांच्या कामासाठी ९०० कोटीहून अधिक खर्च करण्यात येत आहे तसेच जिल्हाधिकारी कार्यालय इमारतीसह इतर ५१ कामासाठी ३२१ कोटी ५० लाखांचे कामे प्रगतीपथावर आहेत याचा उल्लेख त्यांनी आपल्या भाषणात केला. कार्यक्रमानंतर जिजाऊ मल्टीस्टेट गुन्हयाचा तपास लावणारे पोलीस उपनिरीक्षक सिद्धेश्वर मुरकुटे व तुळशीराम जगताप यांचा सन्मान करण्यात आला तसेच मंत्री महोदयांचे हस्ते शहीद जवान पांडुरंग वामन तावरे यांच्या वीर पत्नी गोदावरी तावरे यांना ताम्रपट प्रदान करण्यात आला. यावेळी शाळांच्या पथकांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोलीस दलाचे अनिल शेळके यांनी केले.

## अशोक काळकुटे यांना मभ्रष्ठचार विरोधी पुरस्कार जाहीर.



बीडें प्रतिनिधी.बीड जिल्ह्यातील लाचखोर अधिका-यांच्या विरोधात मोहीम राबवून अनेक अधिका-यांचे वाभाडे काढणारे आणि लाचलुचपत विभागाच्या माध्यमातून लाचखोरांच्या विरूध्द तक्रारी देऊन सापळा कारवाई करणारे पत्रकार अशोक काळकुटे यांना भ्रष्टाचार विरोधी पुरस्कार जाहिर झाला आहे. याबाबत ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या प्रेरणेने स्थापित, भ्रष्टाचार विरोधी जनजागृती अभियान बीड यांच्याकडून पत्रकार अशोक काळकुटे यांना यावर्षीचा भ्रष्टाचार विरोधी पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार दि. २६ जानेवारी २०२५ रोजी बीड येथे देण्यात येणार आहे. यासाठीचे निमंत्रण आणि पुरस्कार जाहिर करण्यात आल्याचे पत्र पत्रकार अशोक काळकुटे यांना पाठवण्यात आले आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी अध्यक्ष म्हणून ॲड. अजित एम देशमुख, प्रमुख उपस्थिती शंकरराव शिंदे (डी.वाय. एस.पी ACB), प्रमुख पाहुणे म्हणुन राजकुमार घायाळ यांची उपस्थिती असणार आहे. तर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या प्रेरणेने स्थापित, भ्रष्टाचार विरोधी जनजागृती अभियान बीड चे संस्थापक अध्यक्ष नवनाथ नाईकवाडे यांच्याकडून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तर या कार्यक्रमासाठी सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# मंत्री दत्तात्रय भरणे बीडला आले अन् फुकट फुगीरी मारुन गेल्या सारखे निघून गेले!

## अजितदादांनी काय फक्त ध्वजारोहणासाठीच पाठविल होत का? निदान त्यांना सांगायच तरी बीडला जाऊन ध्वजारोहण झाल्यावर कलेक्टरांकडून अढावा घ्या?



जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या ऐवजी अल्पसंख्याक मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनानिमित्त सार्वजनिक ध्वजारोहण करण्यात आले. ते बीडच्या दौऱ्यावर आले पण त्यांनी शहरातील अल्पसंख्याक मुलींचे मंजूर वस्तीगृह, मागणी करण्यात येत असलेल्या उर्दू घर बाबतीत चकार शब्दही काढला नाही. यामुळे अल्पसंख्याक समाजातून नाराजी व्यक्त केली जात आहे. तसेच त्यांचे सत्कार करण्यासाठी गर्दी करणाऱ्यांनाही याची आठवण राहिली नाही. यामुळे अल्पसंख्याक मंत्री आले अन् हार,तुरे घेऊन अन् ध्वजारोहण करुन फक्त मिरवून गेल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. बीड शहरातील अनेक वर्षांपासून मागणी असलेले अल्पसंख्याक समाजाचे मुलींचे वसतिगृह आणि उर्दू घर हे आहेत. यातील अल्पसंख्याक मुलींचे वस्तीगृह मंजूर आहे. पण जागे अभावी तो रेंगाळत पडला आहे. यासाठी डाक बंगला, जुनी तहसील इमारत, खासबाग भागातील जागा अशा तीन ठिकाणी जागा आहे. पण यात पुढाऱ्यांचे एकमत होत नसल्याने हे वस्तीगृह मंजूर होऊन ही धुळखात पडून आहे. तसेच उर्दू घरची मागणीच सुरू आहे. पण सरकार स्थापनेनंतर प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने राज्याचे अल्पसंख्याक मंत्री दत्तात्रय भरणे बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. यामुळे जिल्ह्यातील अल्पसंख्याक समाजाच्या आशा पल्लवित झाल्या होत्या, ते या दौऱ्यात जिल्हा प्रशासनाची बैठक घेऊन त्यामध्ये अल्पसंख्याक समाजाच्या अडचणींचा आढावा घेतील व त्यावर काही निर्णय होईल असा अंदाज होता. पण या दौऱ्यात असं काहीच न घडल्याने हा दौरा वांझोटा ठरल्याचे दिसून येत आहे. तसेच निदान यावेळी त्यांनी येथे मंजूर असलेल्या अल्पसंख्याक मुलींच्या वस्तीगृहाच्या प्रश्नावर आणि नेहमीच मागणी करण्यात येत असलेल्या उर्दू घर बाबतीत काही भाष्य अथवा प्रशासनाकडून माहिती घेणे आवश्यक होते. पण हार तुरे स्वीकारण्याच्या नादात त्यांना याचा विसर पडला आहे. तर त्यांचा सत्कार करण्यासाठी शहरातील अनेकांनी रांग लावली होती. पण त्यांनाही शहर किंवा जिल्ह्यातील समस्यांची आठवण राहिली नाही. यामुळे अल्पसंख्याक मंत्री आले अन् हार तुरे घेऊन झेंडा फडकावून निघून गेले असा हा दौरा ठरला आहे. यामुळे अल्पसंख्याक समाजामध्ये नाराजीचा सूर निघत आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २८ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com


## संपादकीय

# गुंतवणूक महाराष्ट्रात येणार

देशातील सर्वाधिक गुंतवणूक महाराष्ट्रात येणार आहे आणि महाराष्ट्राने केलेल्या सामंजस्य करारांची संख्याही सर्वाधिक आहे. यंदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आंध्रचे मुख्यमंत्री एन.चंद्राबाबू नायडू, तेलंगणचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी असे अनेक मुख्यमंत्री तसेच अनेक राज्यांचे मंत्री दावोस येथे होते. त्यांची अंतर्गत निकोप स्पर्धा होतीच, पण तेथे पक्षीय कुंपणे ओलांडून एक संवादही होता. या स्पर्धेत महाराष्ट्राने बाजी मारली आहे. आपले १५ लाख ७० हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाले. हा आकडा मोठा असून गेल्या वर्षीपेक्षा चौपट आहे. ही झेप मोठी आहे. या बातम्या जसजशा येऊ लागल्या, तसे दोन आक्षेप पुढे आले. पहिला म्हणजे, भारतीय कंपन्यांशीच दावोसला कशासाठी करार करायचे? ते तर इथेही करता आले असते. आणि दुसरा म्हणजे, इतके करार झाले. त्यांच्यामुळे महाराष्ट्रातील बेरोजगारीचा प्रश्न सुटेल का आणि राज्याच्या विकासातला प्रादेशिक असमतोल दूर होईल का? भारतीय कंपन्यांशी दावोसमध्ये करार करण्याची उभय बाजूंनी काही कारणे असतात. एकतर गेल्या काही वर्षांमध्ये दावोस हे अशा प्रकारच्या वार्षिक आर्थिक घडामोडींचे जगातले सगळ्यांत महत्त्वाचे केंद्र बनले आहे. अनेकदा भारतीय कंपन्या सरकारशी करार करत असल्या तरी त्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करणारे अनेक गुंतवणूकदार हे विदेशी असतात. त्यांच्याशी या निमित्ताने संपर्क साधता येतो. दुसरे म्हणजे, अनेक कंपन्या महाराष्ट्रापेक्षा जागतिक व्यासपीठावर वेगळी भूमिका घेतात आणि गुंतवणूक करार करण्यासाठी सरकारकडून अधिकाधिक सवलती किंवा करसूट मिळवू शकतात. आपापल्या राज्याचा आकडा वाढावा आणि स्पर्धेत टिकाव धरता यावा, यासाठी राज्य सरकारही दावोससारख्या ठिकाणी चार पावले पुढे जाऊन अधिक सवलती देऊ करतात. आपल्या आर्थिक शक्तीचे जगाला होणारे दर्शन हा यातला आणखी एक हेतू असतो. महाराष्ट्रात यंदा दोनशे बिलियन डॉलरची गुंतवणूक आल्याची बातमी जगातील मोठ्या उद्योगांचे लक्ष वेधून घेणारी आहे. देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलरची झाल्यास त्यातला महाराष्ट्राचा वाटा एक ट्रिलियन डॉलर म्हणजे ८७ लाख कोटी रुपयांचा असेल. हे लक्ष्य गाठायचे तर अतिशय आक्रमक पद्धतीने महाराष्ट्राचे मार्केटिंग करावे लागेल. ते काम यंदा दावोसमध्ये उत्तम झाले. सगळी प्रस्तावित गुंतवणूक कधीही फळत नाही. मात्र, ही टक्केवारी ७०च्या आसपास नेणे, हे मोठेच यश असते. देशातील अनेक राज्यांना ही टक्केवारी ५०च्या पुढे नेता आलेली नाही. याचे कारण, नुसते करार करून भागात नाही. ते प्रत्यक्षात येण्यासाठी पुढे नोकरशाहीला व सरकारला बरेच काम करावे लागते. महाराष्ट्राला आजवर मिळालेली बहुतेक आश्वासने प्रत्यक्षात उतरली आहेत. हे महाराष्ट्राचे मोठे यश आहे. राजकीय आंदोलनांनी महाराष्ट्रातील काही मोठे प्रकल्प रद्द झाले नसते तर महाराष्ट्र आज आणखी पुढे गेला असता. मात्र, उद्योगस्नेहाचा महाराष्ट्राचा एकंदरीत कित्ता देशातील इतर राज्यांना गिरवावा लागेल. राज्यात येणाऱ्या या संभाव्य गुंतवणुकीतून किती व कुठे रोजगार निर्माण होणार, हा पुढचा कळीचा प्रश्न. यंदा आश्वासन मिळालेले सगळे प्रकल्प नीट उभे राहिले तर १६ लाख नवे रोजगार निर्माण होतील, असा अंदाज आहे. हा आकडा बेरोजगारीचे आव्हान पाहता मोठा वाटणार नाही. मात्र, प्रत्यक्ष रोजगारांच्या तिप्पट आनुषंगिक रोजगार निर्माण होतात. तो लाभ लक्षणीय असतो. यावेळी, विक्रमी गुंतवणूक गडचिरोली जिल्ह्यात येणार आहे, ही आश्वासक बाब आहे. सगळ्यांसाठीच हा एक महत्त्वाचा संदेश आहे. उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले त्याप्रमाणे ङ्गचांद्यापासून बांद्यापर्यंतफ गुंतवणूक आली तर प्रादेशिक असमतोल थोडा तरी कमी होईल. महाराष्ट्राने आता ही गुंतवणूक लाभदायी ठरायची असेल तर रस्ते, रेल्वे, पाणी या सुविधा तसेच कायदा व सुव्यवस्था यांच्याकडे बारकाईने लक्ष द्यावे लागेल. उद्योगांना बसणारा कंत्राटदार व स्थानिक राजकारणाचा फास सोडवावा लागेल. सध्या देशी किंवा परदेशी उद्योग महाराष्ट्रात येतात तेव्हा त्यांना अनेक प्रकारच्या संघटित दादागिरीचा व गुंडगिरीचा सामना करावा लागतो. बीडमधील सरपंच हत्या प्रकरण त्यातूनच उद्भवले आहे.

# फिर एक बार ट्रम्प सरकार

अमेरिकेबरोबर व्यापारात भारत हा सर्वात मोठा भागीदार आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प यांची आता दुसरी इनिंग सुरू झाली आहे. राष्ट्राध्यपदाची शपथ घेतल्यापासून ते सतत धडाकेबाज निर्णय घेत आहेत. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या निर्णयाने जगातील अनेक देश हादरले आहेत. त्यांच्या धाडसी निर्णयांमुळे भारतापुढेही नवीन आव्हाने उभी राहिली आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांचा स्वभाव मुळातच धाडसी आणि आक्रमक आहे. अमेरिका फर्स्ट हे त्यांच्या कारभाराचे सूत्र आहे. अमेरिका आणि अमेरिकेन नागरिकांचे हित सर्वोच्च असल्याचे त्यांनी जगाला ठणकावून सांगितले आहे. साडेपाच वर्षांपूर्वी दि. २३ सप्टेंबर २०१९ रोजी अमेरिकेतील ह्युस्टन शहरात हाऊडी मोदी नावाचा एक भव्य कार्यक्रम योजला होता. शहरातील एनआरजी स्टेडियमवर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प एकाच मंचावर उपस्थित होते. या कार्यक्रमात मोदींनी ट्रम्प यांच्या नेतृत्व गुणांचे व त्यांच्या कारभाराचे मनसोक्त कौतुक केले. जगातील अब्जावधी लोक ट्रम्प यांच्या शब्दाचे अनुकरण करतात, जागतिक राजकारणात ट्रम्प यांच्या भूमिकेला मोठे महत्त्व आहे, ट्रम्प यांच्यामध्ये नेहमीच आपलेपणाची भावना दिसून येते याच कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अब की बार ट्रम्प सरकार, अशी घोषणा दिली होती. त्याला हसतमुखाने प्रतिसाद देत डोनाल्ड ट्रम्प यांनी मोदींचे हात हातात घेऊन, हाऊडी माय फ्रेंड्स, असे म्हणाले होते आज आपण नव्या इतिहासाबरोबरच नवे रसायनही पाहत आहोत, माझे विश्वासू मित्र भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींना मी धन्यवाद देतो एक वर्षानंतर सन २०२० मध्ये डोनाल्ड ट्रम्प हे त्यांची पत्नी मेलानिया व कन्या इवांका यांना बरोबर घेऊन भारताच्या भेटीवर आले होते. त्यावेळी, फेब्रुवारी २०२० मध्ये मोटेरा स्टेडियम नमस्ते ट्रम्प म्हणून शानदार सजवले होते. या कार्यक्रमात ट्रम्प यांनी २७ मिनिटे तर मोदींनी २१ मिनिटे भाषण केले. मोदींनी आपल्या भाषणात ट्रम्प यांचे नाव २१ वेळा घेतले तर ट्रम्प यांनी मोदींचे नाव १५ वेळा घेतले. अहमदाबादमधील तीन तासांच्या भेटीवर असताना ट्रम्प व मोदींनी तब्बल ७ वेळा एकमेकांची गळाभेट घेतली, तर दोन्ही नेत्यांनी तब्बल ९ वेळा एकमेकांचे हातात हात घेऊन उंचावले होते. हाऊडी मोदी व नमस्ते ट्रम्प या कार्यक्रमाला आता साडेपाच-सहा वर्षे उलटून गेली. नायगराच्या धबधब्यातून आणि साबरमती नदीतून बरेच पाणी वाहून गेले. दि.२० जानेवारी २०२५ रोजी डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून दुसऱ्यांदा शपथ घेतली आणि गेल्याच वर्षी नरेंद्र मोदी यांनी भारताचे पंतप्रधान म्हणून हॅटट्रीक संपादन केली. आपल्या दुसऱ्या इनिंगमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांनी एकापाठोपाठ असे धडाकेबाज निर्णय घेण्याचा सपाटा लावला आहे. अमेरिकेत आता सुवर्ण युगाला सुरुवात झाली आहे असे त्यांनीच पहिल्या भाषणाची सुरुवात करताना म्हटले. राष्ट्राध्यक्ष म्हणून ट्रम्प यांनी २० जानेवारीला शपथ घेतली आणि मावळते राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांनी घेतलेले ७८ निर्णय एका फटक्यात रद्द केले. ट्रम्प सरकार सर्व कारभार ताब्यात घेईपर्यंत फेडरल (केंद्रीय) पातळीवरील अधिकाऱ्यांनी नवे आदेश काढू नयेत असेही निर्देश दिले. फेडरल पातळीवरील नव्या प्रशासकीय नेमणुकाही त्यांनी एका आदेशाद्वारे गोठवल्या आहेत. अमेरिकेत जन्मल्यावर स्थलांतरीच्या बाळांना आपोआप मिळणारं नागरिकत्व रद्द करण्यापासून ते बेकायदेशीर स्थलांतर रोखण्यापर्यंतच्या निर्णयांवर ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्ष म्हणून पहिल्याच दिवशी स्वाक्षऱ्या केल्या. अमेरिकेने पॅरिस करारातून माघार घेतली असल्याचे त्यांनी घेतलेल्या निर्णयातून स्पष्ट झाले. जगभरातून २०० देशांनी एकत्र येऊन हवामान बदल व पृथ्वीचे तापमान नियंत्रित राहावं यासाठी केलेला करार म्हणजे पॅरिस करार. त्यातून अमेरिकेसारखा बलाढ्य देशच बाहेर पडला आहे. सन २०१७ मध्ये ट्रम्प निवडून आल्यावर पहिल्यांदा राष्ट्राध्यक्ष झाले, तेव्हाही त्यांनी पॅरिस करारातून माघार घेतली होती. सन २०२१ मध्ये जो बायडन राष्ट्राध्यक्ष झाले व त्यांनी पॅरिस करारात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. आता पुन्हा तोच निर्णय ट्रम्प यांनी फिरवला असून पर्यावरणपूरक उद्योगांना चालना, प्रदूषणाला आळा व पायाभूत सुविधांना पुरेसा निधी देण्याचे जाहीर केले आहे. बायडन यांनी इलेक्ट्रिक वाहनांच्या उत्पादनांवर भर दिला होता. आता मात्र ट्रम्प यांनी देशाच्या सर्वोच्च पदाची नव्याने सूत्रे हाती घेताच राष्ट्रीय ऊर्जा आणीबाणी जाहीर केली आहे. अमेरिकेत ऊर्जा उत्पादन वाढवणे व ऊर्जेबाबत अमेरिकेला स्वावलंबी बनविणे यावर ट्रम्प यांचा भर असणार आहे. जागतिक आरोग्य संघटनेतून अमेरिकेला बाहेर काढण्याचा आणखी एक धाडसी निर्णय डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतला आहे. ट्रम्प यांच्या पहिल्या राष्ट्राध्यक्षपदाच्या कारकिर्दीत जगातील अनेक देशांना कोविडने वेढले होते. त्या काळात जागतिक आरोग्य संघटनेने बजावलेल्या भूमिकेबद्दल ट्रम्प खूप नाराज होते. त्यांनी जागतिक आरोग्य संघटनेवर तेव्हा जाहीरपणे टीका केली होती. ट्रम्प यांनी म्हटले आहे की, आपल्या देशाचे सरकार जगातील दुसरे देश श्रीमंत व्हावेत यासाठी आपल्याच लोकांवर कर लादत होते. आता मात्र आम्ही बदलणार आहोत. अमेरिकेचे लोक श्रीमंत व्हावेत यासाठी आम्ही अन्य देशांवर टेरिफ व टॅक्स लावणार आहोत. अमेरिकन लोक व त्यांच्या परिवारांच्या आर्थिक सुरक्षेसाठी आम्हाला पावले उचलावी लागतील असे झाले तर त्याचा भारतावर निश्चितच परिणाम होऊ शकतो. दोन्ही देशांतील द्विपक्षीय व्यापार २०२४ या वर्षात १२० बिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचला. अमेरिकेबरोबर व्यापार वाढविण्याचा भारत प्रयत्न करीत असताना अमेरिकेने टेरिफ लावल्यास भारतापुढे काही अडचणी उभ्या राहू शकतात. ट्रम्प यांनी त्यांच्या पहिल्या कार्यकाळात भारत व अन्य देशांतून अमेरिकेत आयात होणाऱ्या स्टीलवर २५ टक्के व अल्युमिनियमवर १० टक्के टेरिफ लावले होतेच. ब्रिक्स देशांनी डॉलरला समांतर नवे चलन जारी करण्याच्या प्रस्तावावर ट्रम्प यांनी कठोर शब्दांत सुनावले आहे. भारत, ब्राझील, रशिया, चीन व दक्षिण ऑफ्रिका (ब्रिक्स देश) यांनी अमेरिकन डॉलर ऐवजी दुसऱ्या कोणत्याही चलनाला समर्थ दिले त्यावर १०० टक्के टेरिफ लावले जाईल असे ट्रम्प यांनी शपथ घेण्यापूर्वीच सूतोवाच केले आहे. दि. ६ जानेवारी २०२१ रोजी कॅपिटॉल हिल इमारतीवर जमावाने हल्ला केल्याची घटना घडली. अगोदर निदर्शने झाली मग हिंसाचार झाला. चार जणांचा मृत्यूही झाला. या प्रकरणात पंधराशेहून अधिक लोकांना पोलिसांनी अटक केली. हे सर्व लोक ट्रम्प समर्थक होते. त्यावेळी झालेल्या निवडणुकीत ट्रम्प यांचा झालेला पराभव त्यांना सहन झाला नव्हता. अटकेतील लोकांना ओलिस ठेवले, अशी प्रतिक्रिया ट्रम्प यांनी तेव्हा दिली होती. या सर्वांना ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्ष म्हणून दुसऱ्यांदा शपथ घेतल्यावर लगेचच माफी दिली. या लोकांनी चुकीचे काहीही केले नव्हते, असे ट्रम्प म्हणाले. बेकायदेशीर स्थलांतरिताच्या विरोधात कारवाई करण्याची तयारी ट्रम्प यांनी पहिल्या दिवसापासूनच सुरू केली.

# महाराष्ट्र कारागृह विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना राष्ट्रपती पदक जाहिर



पुणे । प्रतिनिधी दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजीच्या भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या औचित्यावर महाराष्ट्र कारागृह व सुधार सेवा विभागातील खालील अधिकारी व कर्मचारी यांना गुणवत्तापुर्ण सेवेकरीता केंद्रीय गृह विभागाकडून मा.राष्ट्रपतींचे सेवापदक जाहिर करण्यात आले आहे. विवेक वसंत झेंडे, अतिरिक्त अधीक्षक, कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, सुनील तांबे, पोलीस उपअधीक्षक, कारागृह मुख्यालय, पुणे, अहमद शमसुद्दीन मनेर, हवालदार, सांगली जिल्हा कारागृह, गणेश महादेव गायकवाड, हवालदार, येरवडा मध्यवर्ती कारागृह प्रल्हाद दत्तात्रय कुदळे, हवालदार, दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, येरवडा, पुणे तुळशीराम काशीराम गोरवे, हवालदार, सांगली जिल्हा कारागृह उक्त नमुद कारागृह अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांच्या सेवा कालावधीत शासकीय कर्तव्याप्रती दाखविलेली सचोटी व निष्ठा याबद्दल गुणवत्तापुर्ण सेवेकरीता सदर सेवापदक जाहिर करण्यात आले आहे. सदरील सेवापदक हे नमुद अधिकारी व कर्मचारी यांच्या शासन सेवेतील निष्ठेचा सन्मान आहे. कारागृह विभागाचे प्रमुख मा.श्री.प्रशांत बुरडे, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे व मा.श्री.डॉ.जालिंदर सुपेकर, विशेष पोलीस महानिरीक्षक (मु), कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणेयांनी मा.राष्ट्रपतींचे सेवापदक प्राप्त नमुद अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल व छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण समस्यांच्या विळख्यात

## प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन; क्रिडामंत्री दत्तात्रय भरणे यांना निवेदन :- डॉ.गणेश ढवळे

बीडः- ( दि.२६) खेळाडूंना आपल्याकडे असलेल्या खेळातील कौशल्याला पुढे संधी मिळावी आणि त्यामधून खेळाडू निर्माण व्हावेत या उद्देशाने क्रिडा संकुलांची निर्मिती करण्यात आली.खेळाडुंसाठी उपयुक्त ठरणारे बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल आणि छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण समस्यांच्या विळख्यात असुन संबंधित यंत्रणांचे दुर्लक्ष आणि नियमित देखभाल करण्याकडे दुर्लक्ष यामुळे

खेळाडुंना असुविधेचा सामना करावा लागत आहे. क्रिडा संकुलाच्या विकासासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणात मंजूर करण्यात आलेला निधी जिल्हा प्रशासनाच्या उदासीनतेमुळे बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यातील क्रिडांगणाची विकास कामे रखडलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे क्रिडा संकुलाच्या विकासासाठी आवश्यक निधी देण्यात यावा. आणि रखडलेली कामे पूर्ण ताकडीने पुर्ण करण्यात यावीत. क्रीडा अधिका-यांची रिक्त पदे भरण्यात यावीत. पावसाळ्यात छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा संकुलात पाणी साठल्याने निचरा होत नसल्याने खेळाडुंची अडचण होते.आणि छत्रपती संभाजी महाराज क्रिडा संकुलावर घेण्यात येणा-या राजकीय कार्यक्रमांवर निर्बंध आणावेत या मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.२६ प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी कार्यालया समोर धरणे आंदोलन करण्यात येऊन क्रिडा मंत्री महाराष्ट्र राज्य दत्तात्रय भरणे यांना निवेदन देण्यात आले. निवेदनातील मुद्यांबाबत सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन क्रिडा मंत्र्यांनी दिले.यावेळी आंदोलनात शेख



युनुस, रामनाथ खोड, शेख मुबीन ,शिवशर्मा शेलार आदी सहभागी होते.

छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणाची दुरावस्था ; राजकीय सभांना निर्बंध घालावेत :- डॉ.गणेश ढवळे

---छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणाची दुरावस्था झाली असुन नगरपरिषदेमार्फत नियमित स्वच्छतागृहांची साफसफाई करण्यात येत नसल्याने सकाळी आणि सायंकाळी व्यायामासाठी येणा-या नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागतो. सुरक्षा रक्षक नसल्याने रात्री अपरात्री त्याठिकाणी अवैध धंदे चालतात,दारुड्यांचा राबता असतो. व्यायामासाठी बसविण्यात आलेले लोखंडी साहित्याची मोडतोड झाली असुन याकडे नगरपरिषद प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. तसेच या क्रिडांगणावर राजकीय सभा व इतर कार्यक्रमांमुळे क्रिडांगणाची दुरावस्था होत असुन या कार्यक्रमांवर निर्बंध घालण्यात यावेत.हे क्रिडांगण खेळासाठी आरक्षित आहे. खेळाव्यतिरिक्त कोणत्याही कार्यक्रमास परवानगी देण्यात येऊ नये अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २८ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com


# गोवर्धन पवार यांना उपक्रमशील भूगोल शिक्षक पुरस्कार



बीड दिनांक (२७) शहरातील यशवंत विद्यालय या शाळेचे सामाजिक शास्त्र व क्रीडा विभागाचे शिक्षक गोवर्धन नवनाथराव पवार यांना भूगोल प्रज्ञाशोध केंद्र नवी मुंबई या संस्थेमार्फत दरवर्षी दिला जाणारा उपक्रमशील भूगोल शिक्षक पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. गोवर्धन पवार हे आपल्या सामाजिक शास्त्र या विषयांमध्ये नेहमी सक्रिय असतात. तसेच ते भूगोल या विषयासाठी नवनवीन उपक्रम आयोजित करतात. स्पर्धा परीक्षा बद्दल विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन रुजवावा व स्पर्धा परीक्षेची भीती विद्यार्थ्यांमध्ये राहू नये यासाठी प्रयत्न करतात. राज्यामध्ये जे शिक्षक भूगोल विषया विषयी जनजागृती करून अंधश्रद्धा निमूलनाचे काम करतात त्या शिक्षकांना हा पुरस्कार दिला जातो. या निमित्ताने या संस्थेमार्फत २०२४ चा पुरस्कार गोवर्धन नवनाथराव पवार यांना जाहीर करण्यात आला. प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी रोटरी क्लब बीड मिडटाऊन चे अध्यक्ष नितीनजी गोपन, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक गणेश वाघ, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक धुमाळ एम.एस.,कार्यकारी अभियंता सुधाकर बाहेरगव्हाणकर या मान्यवरांच्या हस्ते गोवर्धन नवनाथराव पवार यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# प्रा. संदीप गांडगे यांचा आदर्श उपक्रम

## मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्या वाढदिवस रक्तदान शिबिर घेऊन साजरा .



बीड प्रतिनिधी- वाढदिवस म्हटलं की केक,हारेतुरे,डिजे असा वायफळ खर्च करून अनेक जण करतात परंतु सध्या बीड जिल्ह्यामध्ये रक्ताचा तुटवडा पाहता व एक सामाजिक कार्य म्हणून लक्ष्मण अण्णांचा एकनिष्ठ कार्यकर्ता प्रा.संदीप गांडगे यांनी जिल्हा रुग्णालय बीड येथे रक्तदान शिबीर आयोजित करून वाढदिवस साजरा केला उपस्थित समाजसेवक प्रवीण पालीमकर,रुग्णसेवक शरद झोडगे, अजय जाधव, महेश जाधव,अभय काटे उपस्थित होते..

# येडेश्वरी कारखान्यावर खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते ध्वजारोहन



केजः येडेश्वरी साखर कारखाना युनिट १ आनंद गाव (सा) येथील प्रांगणात ७६ वा भारतीय प्रजासत्ताक वर्धापनदिन खासदार तथा येडेश्वरी साखर कारखान्याचे चेअरमन बजरंग सोनवणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन संपन्न झाला. यावेळी माजी आ.संगीता ठोंबरे, येडेश्वरीचे संचालक त्रिंबक चाटे, बाळकृष्ण भवर, माजी पंचायत समिती सभापती ज्ञानेश्वर चवरे, माजी जि.प.सदस्य महारुद्र तात्या लामतुरे, माजी सभापती कृ.उ.बा. अशोक तारळकर, रमेश शिंदे, खरेदी विक्री संघ केजचे संचालक दिलीप गुळभिळे, शेकापचे नेते भाई मोहन गुंड, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष मनोहर डाके,अमर देशमुख, शंकर जाधव, युवराज लगड, उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे तालुकाध्यक्ष विनायक मुळे, माजी पंचायत समिती सदस्य शिवाजी उर्फ बंडू चौधरी, पिंटू ठोंबरे, प्रशांत मोरे, नगर पंचायत केजचे माजी उपनराध्यक्ष दलील इनामदार, नगरसेवक भाऊसाहेब गुंड, बालासाहेब गाढवे, मुस्तफा खुरेशी, कैसर इनामदार, पत्रकार श्रीकांत जाधव तसेच जिल्ह्यातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे सभासद, शेतकरी बांधव, उपस्थित होत

# विद्यार्थ्यांचे संवेदनशील मन तयार करण्यासाठी स्नेहसंमेलनाची आवश्यकता - डॉ. हेमंत वैद्य

माजलगाव प्रतिनिधी दिनांक २७ जानेवारी २०२५ विद्यार्थ्यांचे संवेदनशील मन तयार करण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलनाची अत्यंत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन भा.शि.प्र.संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्थानिक संकुलाचे कार्यवाह ॲड. विश्वास जोशी, प्रमुख पाहुणे प्रसिद्ध कवी संतोष नारायणकर, केंद्रीय कार्यकारणी सदस्य व श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा.चंद्रकांत मुळे, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, शशीकिरण गडम, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. रमेश गटकळ,



सहप्रमुख प्रा. प्रतिभा जाधव उपस्थित होत्या. पुढे बोलताना हेमंत वैद्य म्हणाले की, स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी जे यश मिळवलेले आहे त्या सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक कौतुक केले व भविष्यातील वाटचालीस शुभेच्छाही दिल्या. अशा वार्षिक स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संस्काराची बीजे रुजवली जातात असे ते म्हणाले. यावेळी यासंगी केंद्रीय कार्यकारणी सदस्य अमरनाथ खुर्पे यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. आजचे वार्षिक स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांचा खास उत्सव आहे पण या उत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वास वेगळे पैलू पाडले पाहिजेत. आपल्या व्यक्तिमत्त्वास आकार देण्यासाठी हे स्नेहसंमेलन भविष्यात नक्कीच तुम्हाला उपयोगात येईल असे ते म्हणाले. याप्रसंगी मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, आपण वर्षभरामध्ये केलेला अभ्यासाचा थकवा घालवण्यासाठी व तुमच्या आयुष्यातील आनंद उत्सव
वाढवण्यासाठी हे वार्षिक स्नेहसंमेलन महाविद्यालय आपल्यासाठी आयोजित करत असते. अध्यक्षीय समारोप करताना एडवोकेट विश्वास जोशी म्हणाले की, अशा वार्षिक स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनास आकार दिला पाहिजे व या माध्यमातून वेगवेगळी कौशल्य आत्मसात करून आपल्या व्यक्तिमत्त्वास योग्य ती दिशा दिली पाहिजे असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी यांनी केले. त्यांनी याप्रसंगी संमेलन आयोजनाची भूमिका स्पष्ट केली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.विकास बोरगावकर यांनी केले तर आभार स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. रमेश गटकळ यांनी मानले. या स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली मनोज दादा जरांगे पाटलांची भेट

बीड । प्रतिनिधी मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भात मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी २५ जानेवारी रोजी उपोषण सुरू केले आहे. त्याठिकाणी जाऊन आ.संदीप क्षीरसागर यांनी रविवारी (दि.२६) रोजी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. तसेच जरांगे पाटलांच्या मागण्या लवकरात लवकर मान्य करण्याची शासनाकडे विनंती केली आहे. २५ जानेवारी पासून अंतरवली सराटी येथे मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या बाबतीत सगेसोयरे अंमलबजावणी, हैद्राबाद गॅझेट करण्याची मागणी घेऊन आंदोलन सुरू केले आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भात मनोज जरांगे यांचे हे सातवे उपोषण आहे. बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी अंतरवली सराटी येथील उपोषणस्थळी जाऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. तसेच त्यांना तब्येतीची काळजी घेण्याची विनंती केली. यासोबतच आ.क्षीरसागर यांनी जरांगे पाटलांच्या मागण्या तातडीने पूर्ण करण्यासाठी शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे.





# संतोष देशमुखांच्या पोस्टमार्टम रिपोर्टमध्ये छेडछाड?



संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या तपासामध्ये नवनवीन माहिती समोर येत आहे. सरपंचांच्या हत्येला आता एक महिना उलटला मात्र अजूनही आरोपींना शिक्षा झालेली नाही. या प्रकरणाचा वाल्मिक कराड मास्टरमाईंड असल्याचा आरोप केला जात आहे. एसआयटी त्यानुसार कराडविरोधात पुरावे गोळा करत आहे. या प्रकरणामध्ये वाल्मिक कराडला वाचवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप विरोधी पक्षातील नेते करत आहेत. अशातच सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी संतोष देशमुखांच्या पोस्टमार्टम रिपोर्टबाबत संशय व्यक्त केला आहे. जे सिव्हिल सर्जन आहेत त्यांची बदलीसुद्धा वाल्मिक कराड आणि धनंजय मुंडे यांनी केल्याचा दावा दमानिया यांनी केला आहे. हॉटेल पियुष इन हे अंबेजोगाई येथील हॉटेल कोणाचे आहे? मला अशी माहिती मिळतेय की. डॉ. अशोक थोरात यांचे आहे. हे बीड रुग्णालयात सिविल सर्जन आहेत. ह्याची चौकशी व्हायला हवी

# आता वाल्मिक कराडचा मुलगाही गोत्यात येणार



बीड । प्रतिनिधी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणानंतर राज्याचे राजकीय आणि सामाजिक वातावरण ढवळून निघाले आहे. एकीकडे खंडणी ते हत्या प्रकरणाचा प्रमुख सूत्रधार असल्याचा आरोप असणारा वाल्मीक कराड १४ दिवसांची न्यायालयीन कोठडीत आहे. दरम्यान परळीत भर तहसील कार्यालयासमोर महादेव मुंडे खून प्रकरणात पंधरा महिने उलटूनही आरोपी फरारच आहे. महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणात वाल्मीक कराडच्या मुलाचं नाव घेतलं जातं. दरम्यान वाल्मीक कराड नंतर आता त्याचा मुलगाही गोत्यात येण्याची शक्यता आहे. या प्रकरणाला आमदार सुरेश धस यांनी पुन्हा एकदा वाचा फोडल्यानंतर बीड मधील घडामोडींना वेग आला आहे. महादेव मुंडे यांचे कुटुंबीय आज पोलीस उपाधीक्षकांची भेट घेणार असल्याची माहिती असून सकाळी ११ वाजता मुंडे कुटुंबीय अंबाजोगाई येथील कार्यालयात जाणार आहेत.

# मातीसाठी लढावं, छातीवर घेऊनीया गोळी - कवी संतोष नारायणकर कवी संतोष नारायणकर यांच्या कवितानी सिद्धेश्वरच्या विद्यार्थ्यांना केले मंत्रमुग्ध

माजलगाव प्रतिनिधी दिनांक २७ जानेवारी २०२५ मातीसाठी लढावं, छातीवर घेऊनीया गोळी अशा आशयावर आधारित मंत्रमुग्ध कविता सादर करून सिद्धेश्वरच्या विद्यार्थ्यांना कविता वाचनाने मंत्रमुग्ध करताना वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनास प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्थानिक शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह ॲड. विश्वास जोशी तसेच मंचावर केंद्रीय कार्यकारणी सदस्य व स्थानिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, प्रशासकीय अधिकारी प्रा.चंद्रकांत मुळे, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, शशीकिरण गडम, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. रमेश गटकळ, सहप्रमुख प्रा. प्रतिभा जाधव उपस्थित होत्या. याप्रसंगी त्यांनी वेगवेगळ्या विषयावर आधारित कविता सादर केल्या. तू आल्यावर पाऊस येतो घेऊन हिरवे रान, तू गेल्यावर पाऊस जातो घेऊन हिरवी पाने, मामाला माझ्या होत्या दोन पोरी, एक होती काळी व एक होती गोरी, रस्ता पार करताना मागे वळून बघ, तू माहेरी गेलीस आणि घरात उंदीर झाले, तू परत आलीस आणि घराचे मंदिर झाले, ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी, नको राहूस आयुष्यात रिकामा, गुण्या गोविंदाने खावी अर्धी भाकर सुखाची, अशा वेगवेगळ्या आईवर, वडिलावर तसेच वेगवेगळ्या प्रेम कविता सादर करून त्यांनी विद्यार्थ्यांची मने जिंकली.याप्रसंगी स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करताना उद्घाटक म्हणून भा.शि.प्र.संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य म्हणाले की, विद्यार्थ्यांचे संवेदनशील मन तयार करण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलनाची अत्यंत आवश्यकता असते.स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी जे यश मिळवलेले आहे त्या सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक कौतुक केले व भविष्यातील वाटचालीस शुभेच्छाही दिल्या.




अशा वार्षिक स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संस्काराची बीजे रुजवली जातात असे ते म्हणाले. याप्रसंगी केंद्रीय कार्यकारणी सदस्य अमरनाथ खुर्पे यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. आजचे वार्षिक स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांचा खास उत्सव आहे पण या उत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वास वेगळे पैलू पाडले पाहिजेत. आपल्या व्यक्तिमत्त्वास आकार देण्यासाठी हे स्नेहसंमेलन भविष्यात नक्कीच तुम्हाला उपयोगात येईल असे ते म्हणाले. याप्रसंगी मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे हे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, आपण वर्षभरामध्ये केलेला अभ्यासाचा थकवा घालवण्यासाठी व तुमच्या आयुष्यातील आनंद उत्सववाढवण्यासाठी हे वार्षिक स्नेहसंमेलन महाविद्यालय आपल्यासाठी आयोजित करत असते. अध्यक्षीय समारोप करताना एडवोकेट विश्वास जोशी म्हणाले की, अशा वार्षिक स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनास आकार दिला पाहिजे व या माध्यमातून वेगवेगळी कौशल्य आत्मसात करून आपल्या व्यक्तिमत्त्वास योग्य ती दिशा दिली पाहिजे असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी यांनी केले. त्यांनी याप्रसंगी संमेलन आयोजनाची भूमिका स्पष्ट केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.विकास बोरगावकर यांनी केले तर आभार स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. रमेश गटकळ यांनी मानले. या स्नेहसंमेलनात महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजलगाव नगरपालिकेच्या वाढीव मालमत्ता करा बाबत नागरिकांच्या तक्रारीची तात्काळ दखल घेऊन उपाययोजना करा -मोहनराव जगताप

## घरपट्टी नळपट्टी बाबत तक्रार असल्यास फेर सर्वे करू -मुख्याधिकारी चव्हाण

माजलगाव- शहरातील अनेक नागरिकांच्या घरपट्टी नळपट्टीच्याबाबत तक्रारी होत्या पाईपलाईन नसताना सुद्धा नळपट्टी तसेच कमर्शियल इंडस्ट्रियल झोन तसेच वित्तीय टॅक्स याबाबत नागरिकांच्या मनामध्ये संभ्रम होता . कोर प्रोजेक्ट अमरावती एजन्सी मार्फत हे काम केले होते त्यांच्या सर्वेनुसार जास्तीचे बिल आल्यामुळे व प्रत्यक्ष नागरिकांच्या घराचे मोजमापा बाबत अनेक तक्रारी होत्या. यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते मोहनराव जगताप यांनी २६ जानेवारी रोजी नगरपालिकेमध्ये मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण व नगरपालिकेच्या कर्मचा-यांचे उपस्थितीत नागरिकांसाठी जनता दरबार भरवला व शहरातील नागरिकांच्या तक्रारींचा पाढा मुख्याधिका-यासमोर वाचला तसेच शहरांमध्ये अनेक पोलवर लाईट नसून घाणीचे साम्राज्य आहे नगरपालिकेमध्ये नागरिकांना अनेक अडचणी येत असल्याच्या तक्रारी होत्या या सर्वांची दखल घेऊन मुख्याधिकारी श्री चव्हाण यांना सांगून ज्या कोर प्रोजेक्ट अमरावती यांनी हा सर्वे केला त्या कंपनीच्या कर्मचा-याला पूर्ण वेळ नगरपालिकेमध्ये बसून नागरिकांच्या वाढीव मालमत्ता बाबत व नळपट्टी बाबत तक्रारीची दखल घेऊन तात्काळ सर्वे करून वस्तुनिष्ठ अहवाल मागून त्यानुसार घरपट्टी व नळपट्टी दुरुस्त करून देण्यात यावी व शहरात आठ दिवसात पोलवरील लाईट बसवण्यात याव्यात याबाबत सूचना केल्या तसेच मुख्याधिका-यांनी या मागण्याबाबत सकारात्मकता दर्शवून लवकरात लवकर वाढीव घरपट्टी बाबत तक्रारीची दाखल घेऊन नागरिकांच्या समाधान करण्याचे आश्वासन दिले. या जनता दरबारास विधानसभा अध्यक्ष नारायण अण्णा डक माजी नगराध्यक्ष साहल भैया चाऊस माजी सभापती नितीन दादा नाईक नवरे दयानंद भाऊ स्वामी माजी नगराध्यक्ष नासेर पठाण संतोष आबा यादव कचरू तात्या खळगे मज्जिद भाई सुरेश काका एरंडे नगरसेवक सुशील लोढा विनायक रत्नपारखी ईश्वर होके सय्यद भाई इमरान भाई मनोज फरके डॉक्टर श्रीराम खळगे शकील कुरेशी रशीद भाई लतीफ भाई फिरोज इनामदार एडवोकेट दीपक देशमुख इरफान मिर्झा उपस्थित होते. यावेळी नागरिकांनी अनेक समस्या मांडल्या तसेच शहराच्या विकासासाठी आम्ही नगरपालिकेच्या सोबत आहोत परंतु मुख्याधिकारी साहेबांनी आम्हाला मूलभूत सुविधांसाठी नगरपालिकेकडून सहकार्य करावे व नगरपालिकेतील कर्मचा-यांना पूर्ण वेळ नागरिकांच्या कामासाठी उपलब्ध राहण्याच्या सूचना द्याव्यात असे सांगितले या जनता दरबारासाठी व वाढीव घरपट्टी मालमत्ता कराबाबत माजी नगरसेवक शरद यादव यांनी पुढाकार घेऊन सर्व नागरिकांना एकत्रित करून प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल शहरातील नागरिकांच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले.



बीड/महाराष्ट्र
महाराष्ट्र विशेष वार्ता

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

मंगळवार २८ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## प्रजासत्ताक दिनी सात गाव अंधारात , महावितरणचा भोंगळ कारभार:- राजेंद्र आमटे

### शेतकरी,नागरिकसह तीव्र आंदोलन करणार



बीड (प्रतिनिधी) खांडे पारगाव परिसरातील सात गाव तीन ते चार दिवसा पासून अंधारात आहेत राष्ट्रीय सन प्रजासत्ताक दिनी सुधा सात गाव अंधारात महावितरणच्या भोंगळ कारभाराने सात गावातील शेतकरी नागरिक त्रस्त झाले आहेत. शेतक-याची पीक करपून गेली आहे. गावात लाईट नसल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. पुढील महिन्यात १० वी १२ वी परीक्षा आहेत मुलांना अभ्यास करता येत नाही. लाखो रुपये खर्च करून हि आमच्या मुलाचं भविष्य अंधारात का? सात गावात लाईट नसल्याने पाणी पंप, पिठाच्या गिरण्या, बंद आहेत नागरिक हैराण झाले आहेतखांडे पारगाव परिसरातील खांडे पारगाव, अंथरवन प्रिंप्रि, नागपूर खुर्द, उमरी, नागपूर बुद्रुक, उमरद खालसा, अंथरवन प्रींप्री या सात गावात मागील तीन चार दिवसांपासून लाईट नाही प्रजासत्ताक दिनी सात गाव अंधारात महावितरण कंपनीने तत्काळ सात गावातील विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात यावा सात गावातील विद्युत तारा नवीन टाकाव्यात, सात गावच्या पाठपुराव्याने मंजूर नवीन ५ र्िि ट्रान्सफॉर्मर बसवण्यात यावा शेतक-यांना उच्च दाबाने विद्युत पुरवठा करावा अन्यथा सात गावातील शेतकरी नागरिक महिला सह शाळकरी विद्यार्थी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा अधीक्षक अभियंता कार्यालयात महावितरण जालना रोड येथे निवेदन देऊन देण्यात येत आहे या वेळी शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, नागपूर खुर्द माजी सरपंच जालिंदर साळुंके, खाजाभाई पठाण ( उप सरपंच) मुरली आमटे, दीपक आमटे, अतुल आमटे, महादेव आमटे, आदीच्या वतीने इशारा देण्यात येत आहेराजेंद्र आमटे शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष

# बीडमध्ये आणखी ६ आरोपींविरोधात मकोका; पोलीस ॲक्शनमोडमध्ये

बीड जिल्ह्याच्या मस्सोजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून हत्या करण्यात आली, या घटनेनंतर बीडसह राज्यात वातावरण चांगलंच तापलं आहे. या प्रकरणातील सात आरोपींवर पोलिसांनी मकोका अंतर्गत कारवाई केली आहे. वाल्मिक कराडवर देखील मकोका लावण्यात आला आहे. दरम्यान एकीकडे संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणातील सर्व आरोपींना मकोका लावण्यात आला आहे. तर दुसरीकडे बीडमधूनच आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे ती म्हणजे एका गोळीबार प्रकरणात अक्षय आठवले गँगविरोधात देखील पोलिसांनी मकोकाची कारवाई केली आहे.



अक्षय आठवले गँगच्या सहा जणांविरोधात मकोका लावण्यात आला आहे, एकूण सहा आरोपींविरोधात मकोका अतंर्गत कारवाई करण्यात आली आहे. सहापैकी चार आरोपींना अटक करण्यात आली आहे, तर दोन आरोपी फरार आहेत. या आरोपींना गोळीबार प्रकरणात अटक करण्यात आली आहे. या प्रकरणात अक्षय आठवले, ओंकार सवाई, मनीष क्षीरसागर यांना अटक करण्यात आली आहे, तर सनी आठवले सह अन्य एकजण फरार आहे. संतोष देशमुख हत्याप्रकरणातील आरोपींवर मकोका लावण्यात आला होता, त्यानंतर बीडमध्ये आता दुस-यांदा या कायद्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

## काय आहे नेमकं प्रकरण?

बीडमध्ये जुन्या वादात बदनामी झाल्याच्या रागातून घरात घुसून गोळीबार करण्यात आला होता. या घटनेत एक तरुण गंभीर जखमी झाला होता. विश्वास दादाराव डोंगरे असं या घटनेत जखमी झालेल्या तरुणाचं नाव आहे. डोंगरे आणि आठवले यांच्यात जुना वाद आहे. यापूर्वी देखील आठवले आणि डोंगरे गटात जोरदार राडा झाला होता, दोन्ही गटांकडून परस्परविरोधी तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर अक्षय आठवले याने डोंगरे यांच्या घरात घुसून गोळीबार केला होता. यामध्ये विश्वास दादाराव डोंगरे हा तरुण गंभीर जखमी झाला होता. त्यानंतर पोलिसांनी या प्रकरणातील आरोपींना अटक केली. आता त्यांच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे, या प्रकरणातील दोन आरोपी अजूनही फरार आहेत.

# शिवजन्मोत्सव अध्यक्षपदी ॲड बालाजी वाघमारे तर स्वागताध्यक्षपदी पि.के.कदम यांची निवड

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : दरवर्षी प्रमाणे याही वर्षी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सव नांदेड शहरात मोठ्या हर्षोउल्हासात साजरा होणार असुन त्या समितीच्या अध्यक्षपदी संभाजी ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड बालाजी वाघमारे तर स्वागताध्यक्षपदी मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष पि.के.कदम यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. मराठा सेवा संघ सार्वजनिक शिवजन्मोत्सव कार्यकारिणी निवडी संदर्भात अत्यंत महत्वाची बैठक यशवंतराव चव्हाण मराठा विद्यार्थी वस्तीग्रह नांदेड येथे संपन्न झाली.बैठकीच्या अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे प्रदेश महासचिव डॉ पंजाब चव्हाण,मराठा सेवा संघाचे विभागीय



अध्यक्ष इंजि शे.रा. पाटील,इंजि.व्हि. टी.शिंदे, संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील उपस्थित होते. डॉ पंजाबराव देशमुख शिक्षक



परिषदेचे व्यंकटराव जाधव,शिवाजी पाटील बामणीकर,मराठा सेवा संघ जिल्हाध्यक्ष सतीशकुमार जाधव,,मराठा सेवा संघ माजी जिल्हाध्यक्ष उद्धव सुर्यवंशी, नानाराव कल्याणकर,जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्षा सुमित्रा वडजकर, कल्पना चव्हाण आदि प्रमुख पाहुणे उपस्थित होते. नांदेड जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव १९ फेब्रुवारी रोजी गेल्या पंचवीस-तीस वर्षापासुन वैचारिकरित्या करणारी एकमेव मराठा सेवा संघ संघटना राहिलेली आहे.या उत्सवात महिलांचा युवकांचा हजारोने सहभाग असतो.शिवजन्मोत्सव दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वैचारिक मेजवानी सह हर्षोउल्हासात साजरा करूयात तसेच जन्मोत्सवासाठीचा निधी मराठा सेवा संघाच्या खात्यावरच गतवर्षी प्रमाणे जमा करुन पारदर्शकता आणुयात असे मत बैठकीचे अध्यक्ष मराठा सेवा संघाचे प्रदेश महासचिव डॉ पंजाब चव्हाण यांनी मांडले. मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड व ३३ कक्ष आयोजित सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती अध्यक्षपदी संभाजी ब्रिगेड प्रदेश उपाध्यक्ष ॲड बालाजी वाघमारे यांची तर स्वागताध्यक्षपदी मराठा सेवा संघ जिल्हाध्यक्ष पि.के.कदम यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.यावेळी मराठा सेवा संघाचे प्रल्हाद दुरपडे,संभाजी ब्रिगेड विभागीय कार्याध्यक्ष श्रीनिवास शेजुळे, शिवाजी पाटील आलेगावकर,पी. जी.कर्हाळे,संजय हंबर्डे,कमलेश कदम, स्वप्नील शिंदे,अंकुश कोल्हे, अविनाश शिंदे, अशोक कदम,भास्कर थेटे,यांच्या सह अनेकांची उपस्थिती होती.

## ७६ वा भारतीय प्रजासत्ताक दिन देवगाव ग्रामपंचायत कार्यालय येथे साजरा



वडवणी/प्रतिनिधी अंकुश गवळी वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव येथे ७६ वा भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला आहे... कार्याक्रमा प्रसंगी उपस्थित देवगाव नगरीच्या उपसरपंच सौ. सुषमा महादेव सुरवसे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले आहे..ग्रा पं सदस्य राहुल सुरवसे गणेश गवळी जोतीराम ईतापुरे. गवळी ज्ञानेश्वर यांच्या हस्ते महामानव च्या प्रतिमा पुजन करण्यात आले स्वातंत्र्य प्राप्ती नंतर जगातील कोणताही आर्थिक ओळख नाही अशा स्थितीत असणारा आपला देश आता जगातील पाचवी अर्थ सत्ता बनला आहे. याच पार्श्वभूमीवर आपल २६ जानेवारीला ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा करत आहोत या निमित्ताने देशाच्या विकासाची वाटचाल आणि त्याला असलेले संविधानाचे अधिष्ठान अधिक प्रभाविक पणाने कार्यरत असल्याचे जाणवते आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले त्यानंतर राज्य घटना अर्थातच संविधान लिहिण्याचे काम सुरू झाले या संविधानस स्वीकार करून आपण संघराज्य हे देखील सार्वभौम प्रजासत्ताक दिन म्हणून घोषित केले तो दिवस अर्थात २६ जानेवारी १९५० होय... आज देवगाव ग्रामपंचायत व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आदर्श देवगाव येथे ७६वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे यावेळी शाळेचे मुख्याध्यापक हाडुळे सर यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथील ध्वजारोहण केले व त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे विद्यार्थी यांनी पथनाट्य मधुन चांगला संदेश दिला आहे... यावेळी गावातील नागरिक शिक्षण प्रेमी सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य शालेय समिती अध्यक्ष उपाध्यक्ष सदस्य अंगणवाडी सेविका मदतनीस आशा कार्यकर्ती पत्रकार बाधवं सह शिक्षक व विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.... कार्यक्रम चे आभार प्रदर्शन काडीवडगाव केंद्राचे मुख्याध्यापक लांडगे सर यांनी केले

## खा बजरंग बप्पा सोनवणे यांचा परळी तालुका दौरा अनुसया मंगल कार्यालय सिरसाळा येथे महत्त्वपूर्ण बैठक पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे - तालुका अध्यक्ष देवराव लुगडे महाराज

परळी (वार्ताहर) बीड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांचा परळी तालुका महत्वपूर्ण दौरा आज मंगळवार दिनांक २८ जानेवारी २०२५ रोजी असून या दौ-याची सुरुवात पुढील प्रमाणे धायगुडे पिंपळा ता अंबाजोगाई येथून दुपारी १२:४५ वाजता परळी कडे प्रयाण मिरवट ता परळी येथील चालू असलेला अखंड हरिनाम सप्ताहला दुपारी ०१.१५ भेट मिरवट येथून दुपारी ०१.४५ वा सिरसाळ्याकडे प्रयाण, अनुसया मंगल कार्यालय सिरसाळा येथे






दुपारी ०२.०० वा पदाधिकारी कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक, अर्जुन ईश्वर विद्यालय सिरसाळा येथे दुपारी ०३.३० वाजता सदिच्छा भेट सोयीनुसार केज कडे प्रयान खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या उपस्थितीत अनुसया मंगल कार्यालय सिरसाळा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रमुख पदाधिकारी कार्यकर्त्यांची बैठक होत आहे या महत्वपूर्ण दौ-यात व बैठकीला पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे परळी तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी केले

## ग्रामपंचायत कार्यालय देवगाव येथे स्वराज्य प्रेरिका माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी



वडवणी/ प्रतिनिधी अंकुश गवळी

संपूर्ण मानव जातीला प्रज्ञा, शील करुणेची शिकवण देणारे तथागत भगवान बुद्ध वारकरी संप्रदायाचा पाया ज्यांनी रचला ते ज्ञानेश्वर महाराज इतिहासाची पान आम्ही जेव्हा चाळत जातो तेव्हा महाराष्ट्राच्या इतिहासाच्या पानापानात एक नाव आदराने घेतल्या जातं.ते म्हणजे राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब माँ साहेबाच्या चरणी सर्वप्रथम मनाचा मुजरा.. शून्यातून स्वराज्य निर्माण करणारे छत्रपती शिवराय, शंभू राजे.. राजर्षी शाहू महाराज आणि देशाच संविधान लिहत असताना ज्याच्या डोळ्यासमोर छत्रपतीच स्वराज्य होतं ते घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सर्व महापुरुषांना सर्वप्रथम विन्रम अभिवादन.. कोटी कोटी प्रणाम,आज १२ जानेवारी महाराष्ट्राच्या इतिहासातला सर्वात सुंदर दिवस मी तर म्हणेल,महाराष्ट्राचा इतिहास आजपासून सुरु होतो.राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जन्मापासून १२जानेवारी १५९८ मध्ये सिंदखेड राजा जिल्हा बुलढाणा याठिकाणी जन्मलेल्या जिजाऊ माँसाहेब महाराष्ट्र माता ठरल्या त्यांनी इथल्या मराठी माणसाच्या रक्तात स्वाभिमान जागा केला आणि शून्यातून स्वराज्य निर्माण करण्यासाठी शिवराय घडवले.. शिवाजी महाराजाच्या गुरु, मार्गदर्शक आणि आई माँसाहेब जिजाऊ सर्वाना वंदनीय आहे.. त्या लखूजी जाधव व म्हाळसाबाई जाधव यांची कन्या होत्या.. पुढे जिजाऊचा विवाह शूर मराठी सरदार राजे शहाजी भोसले सोबत झाला.. आणि नंतर त्यांना शिवाजी आणि संभाजी आणि यंकोजी हे ३पराक्रमी मुलं झाली..त्यामध्ये सर्वात कर्तबगार छत्रपती शिवराय होते, लहानपपणापासून जिजाऊने शिवाजी महाराजाना राम, कृष्ण यांच्या गोष्टी सांगितल्या,आणि त्याच्या मनात स्वराज्याच बीज पेरलं.. म्हणून शिवराय घडले.. शून्यातून स्वराज्य कस निर्माण करायच? मराठी अस्मिता कशी जागवावी?हे जिजाऊ माँसाहेब यांच्याकडून शिकायला मिळतं.. म्हणून महाराष्ट्र घडला.

ग्रामपंचायत कार्यालय देवगाव येथे स्वराज्य प्रेरिका माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले※

यावेळी गावातील सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य पत्रकार गावातील नागरिक यावेळी उपस्थित होते

# आठवीच्या विद्यार्थ्यानं डोक्यात गोळी झाडून आयुष्य संपवलं, सोलापुरात खळबळ



## वडिलांच्या सर्व्हिस रिवॉल्व्हरमधून गोळ्या झाडून आत्महत्या केली.

सोलापुरातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे, या बातमीनं खळबळ उडाली आहे. आठवीत शिकणा-या एका मुलानं बंदुकीने आपल्या डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली आहे. सोलापूरच्या माढ्यातील आढेगावमध्ये ही घटना घडली आहे. श्रीधर गणेश नष्टे असं आत्महत्या केलेल्या या १४ वर्षांच्या मुलाचं नाव आहे. दरम्यान घटनेची माहिती मिळताच टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले असून, घटनेबाबत अधिक तपास सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. दरम्यान श्रीधरने नेमकी आत्महत्या का केली? याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाहीये.श्रीधरकडे बंदूक कशी आली? श्रीधर गणेश नष्टे हा माढ्यातील आढेगावचा रहिवासी आहे, तो आठवीच्या वर्गात शिकत होता. त्याने बंदुकीची गोळी डोक्यात झाडून आत्महत्या केली आहे. त्याचे वडील गणेश नष्टे हे सिमा सुरक्षा दलात कार्यरत आहेत. त्यांचीच ही बंदूक आहे. या बंदुकीचं लायन्सस जम्मू काश्मीरचं आहे. त्याने आपल्या वडिलांची बंदूक घेतली. शांतपणे खुर्चीवर बसला आणि काही कळायच्या आतच स्वतःच्या डोक्यात गोळी झाडली. या घटनेनं नष्टे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मात्र त्याने टोकाचं पाऊल का उचलंल याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाहीये.

दरम्यान दोन दिवसांपूर्वी मुंबईत देखील असाच एक प्रकार घडला आहे. मुंबई पोलीस दलातील एका हवालदाराच्या मुलानं आत्महत्या केली. हर्ष म्हस्के असे या २० वर्षांच्या तरुणाचं नाव आहे, त्याने आपल्या वडिलांच्या सर्व्हिस रिवॉल्व्हरमधून गोळ्या झाडून आत्महत्या केली. ही घटना मुंबईतील लोअर परेल परिसरातील एन. एम. जोशी मार्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. या प्रकरणी पोलीस तपास सुरू आहे. मात्र हर्ष याने आत्महत्या का केली? याच कारण अद्याप समोर आलेलं नाही. ही घटना ताजी असतानाच आता सोलापूरमधून ही धक्कादायक घटना समोर आली आहे. श्रीधर गणेश नष्टे या मुलानं आत्महत्या केली आहे, मात्र त्याच्याही आत्महत्येचं कारण अद्याप अस्पष्ट आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com